CMYK

बीड । रविवार
१५.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ७५
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# अलोट गर्दीत माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवाची सांगता

## माऊली दादाच्या त्यागाने चाकरवाडीच पंढरपूर झालं: प पूज्य प्रदीप मिश्राजी

## माऊली दादा करुणेचा सागर: ह.भ.प. संदीपान महाराज हासेगावकर





### ▸तपोनिधी महादेव महाराज तात्या यांनी आभारी मानले

माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथा साठी अनेकांनी खूप कष्ट घेतले आहेत. माऊली दादावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक माणसाने या माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास मेहनत कष्ट करून यशस्वी केला या मध्ये माऊली दादांवर असणारी लोकांची श्रद्धा व प्रेम या मुळे हा माऊली दादाचा रौप्यम होत्सवी सोहळया आनंदात पार पडला.

### ▸महाप्रसादाच्या महापगती

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराज माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह काल्याचे कीर्तन व शिवपुराण कथा सांगता झाल्यानंतर भाविक भक्तांच्या महाप्रसादाच्या महापगती बसवण्या आल्या सर्वांनी महापगातील महाप्रसाद घेतला

### ▸मान्यवरची उपस्थिती

ह. भ. प. लक्ष्मण महाराज मेंगडे, बँकटस्वामी संस्थान, माजी मंत्री धनंजय मुंडे,ह. भ. प. रामकृष्ण रांधवे बापू महाराज,ह.भ.प.नाना महाराज कदम, ह. भ. प. सुरेश महाराज जाधव, नंदकिशोर मुडदा, रमेश आडसकर यांची उपस्थिती होती.







### ● चाकरवाडीत महाप्रसादाच्या महापांगती

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

जेथे साधू संताचा पवन स्पर्श होतो, तेथील जागेचे सोनं झाल्याशिवाय रहात नाही. संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या त्यागामुळे चाकरवाडी फक्त चाकरवाडी राहिली नसून ती प्रति पंढरपूर झाली आहे.असे विचार प.पु. प्रदीपजी मिश्रा यांनी शिवपुराण कथेच्या सांगतेला काढले.

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळयात अखंड हरिनाम सप्ताह व श्री प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिव महापुराण कथा आयोजन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शनिवार (दि.१४) रोजी अखंड हरिनाम सप्ताह व श्री प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेची सांगता महाप्रसादाच्या महापांगतीने झाली.

प्रदीप मिश्राजी यांनी शिवमहापुराण कथेस समारोप करताना जेथे साधू संताचा पवन स्पर्श होतो, त्या जागेत सोनं झाल्याशिवाय रहात नाही. संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या त्यागामुळे चाकरवाडी फक्त चाकरवाडी राहिली नसून प्रति पंढरपूर झाली आहे. संत संगतीने जीवनचे सोनं होतं, माणसाने संगती चांगली ठेवावी. माशी भाजीपाल्यावर बसवली तर तिची किंमत बदलत नाही, माशी, पेढयावर बसल्यावर तिची किंमत वाढत नाही, परंतु तीच माशी सोनं मोजताना सोन्यावर बसली किंवा हिरा मोजताना हिऱ्यावर बसली तर त्याची किंमत कित्येक पटीने वाढते तसे आपण कोणाच्या संगतीत आहेत हे महत्त्वाचं आहे, त्यामुळे साधू संताच्या संगतीत राहीले तर मनुष्याच्या जीवनचे सोने झाल्याशिवार राहणार नाही. आज माऊली दादांच्या त्यागामुळे चाकरवाडीच श्री क्षेत्र चाकरवाडी प्रतिपंढरपूर झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले. शिव महापुराण कथा सांगता झाल्यानंतर अखंड हरिनाम सप्ताहामध्ये शनिवारी श्री ह. भ. प. संदीपान महाराज हासेगावकर, श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र आळंदी देहू यांचे काल्याचे कीर्तन कीर्तन

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन थेट शेतात, तलावावर देखील लक्ष

## जिल्हाधिकारी यांची सक्रियता चर्चेत ; खंडाळा येथे पेरणी, बिंदुसरा तलावाचीही पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करीत आणि पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेत बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शुक्रवारी प्रशासनाच्या कामकाजाचा एक वेगळा आदर्श घालून दिला. त्यांनी एकीकडे खंडाळा (ता. बीड) येथे शेतात उतरून स्वतः सोयाबीन पेरणी केली, तर दुसरीकडे बीड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बिंदुसरा तलावाची पाहणी करून जलसंधारणाविषयी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. शेतकऱ्यांसोबत



मळ्यात थेट सहभाग– पावसाळा सुरू होताच शेतकरी वर्ग आपल्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी मतदारसंघात आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने पंतप्रधान घरकुल आवास योजनेत 18 हजार घरकुले मंजूर

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी, पाटोदा, शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना–ग्रामीण अंतर्गत २०२५–२६ करिता १८ हजार ७ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन करावेत या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

पंतप्रधान घरकुल योजना अंतर्गत घरकुल मंजुरी प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मतदारसंघात ड घरकुल सर्वेक्षणाचे काम सुरू असताना ब सर्वेक्षण बाबत आ.सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार भेट घेऊन लक्ष वेधल्याने लाभार्थीच्या घरकुल मंजुरी मध्ये लाभार्थ्यांचा जास्तीचा फायदा असून सर्वाधिक घरकले मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकार व राज्य सरकारचे आ.सुरेश धस यांनी आभार मानले आहे.यामध्ये आष्टी ७३०२,पाटोदा ५९१५,शिरूर



कासार ४७९० तिन्ही तालुक्यात एकूण १८ हजार ७ घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे करावेत.घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे ऑनलाइन प्रणाली मार्फत करून घ्यावेत म्हणजे लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा होण्यास सुलभ जाईल. आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन करावेत या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.




# घरकुलाचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी ग्रामसेवकाने लाभार्थ्याकडून घेतले एक हजार रुपये

## गटविकास अधिकारी यांच्याकडे माजी उपसरपंच ,आणि सदस्याची तक्रार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा जवळ असलेल्या राहेरी गावाला पंतप्रधान आवास योजने अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल देण्यासाठी रजिस्ट्रेशन करावयाचे असून हे रजिस्ट्रेशन करण्यासाठी ग्रामसेवक यांनी लाभार्थ्याकडून ऑनलाइन करण्यासाठी एक एक हजार रुपये घेतल्याची तक्रार माजी उपसरपंच अविनाश लाड आणि माजी सदस्य शिवकुमार लाड यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांच्या कडे करून संबंधित ग्रामसेवक यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

या बाबत सविस्तर असे की राहेरी ग्रामपंचायत अंतर्गत बेघर,गरीब,गरजू लाभार्थ्यांना पी एम वाय आवास योजने अंतर्गत घरकुले मिळणार असून यासाठी करावे लागणारे रजिस्ट्रेशन प्रक्रिया ही मोफत होती आणि आहे.परंतु हे रजिस्ट्रेशन करण्यासाठी ग्रामसेवक गिरी हे लाभार्थ्याकडून प्रत्येकी एक एक हजार रुपये घेतले असून ,तीन ते चार हजार रुपये घरपट्टी भरण्याची मागणी करतात घरपट्टी जमा करणे ही जबाबदारी आहे या नात्याने पैसे भरल्यास त्याची पावती ही देत नसल्याचे त्यांनी म्हटले

▶▶ उर्वरित पान २ वर



CMYK

# जीवनात एकतरी वारी अनुभवावी !

अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे, आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ।। असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ।।, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।, असे म्हटले जाते.



संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणार्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे.

येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणार्या वारकर्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी ! श्रीक्षेत्र आळंदी आणि देहू येथून निघणार्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अन् जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव ! ऊन-पावसाची तमा न बाळगता भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळ-मृदुंगाचा गजर करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचेच प्रतीक ! कोणाच्याही तोंडवळ्यावर चिंता नाही कि मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांची अपेक्षा नाही. वारकर्यांना प्रतिदिन १० ते २० किलोमीटरचा टप्पा चालत पार करावा लागतो. सकाळी लवकर मार्गस्थ व्हावे लागते. अल्पाहार आणि महाप्रसादही वाटेतच घ्यावा लागतो. सायंकाळी विलंबाने मुक्कामाच्या ठिकाणी पोचल्यानंतर भजन-कीर्तन होऊन दिवसाची समाप्ती होते. विठुमाऊली तू माऊली जगाची । माऊलीच मूर्ती विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा ।। असा वारकऱ्यांचा पंढरीच्या विठुरायाप्रती असलेला भाव जगात सुविख्यात आहे. विठ्ठल विठ्ठल, जय हरि विठ्ठल, असे विठ्ठलाला आळवत वारकरी प्रतिवर्षी वारीला जातात आणि परत आल्यावर स्वत:पुरतीच नव्हे, तर परिसरातही विठ्ठलाची उपासना करतात. वर्षभर प्रपंचात म्हणजेच मायेत गुंतलेल्या जीवाला वारीमार्गात येणारे अनुभव आणि अनुभूती जीवनाचे सार सांगून जातात. वारीच्या अंतिम चरणी जेव्हा पांडुरंगाचे दर्शन घडते तेव्हा तो अनुपम्य सोहळा कधीच संपू नये असे वाटते. ज्या क्षणी जीव शिवाचे मिलन घडते तो क्षण स्वर्गीय आनंदाचा अनुभव देतो. एरव्ही आरामदायक चारचाकीतून प्रवास करून पंढरपूरला जाणे आणि वारीत सहभागी होऊन माउलीला भेटणे यातील भेद वारकरीच सांगू शकत. या भेटीला कोणत्याही ऐहिक सुखाची सर नाही. हा आनंद जीवनात एकदा तरी घ्यावा. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी. (संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

# जीवनात प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच!

वडिलांचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) १५जून २०२५ रोज रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात माय-बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही.कारण आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती,संस्कार,संस्कृती,जडण-घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई- वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे.त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन(मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी-मावसा, आत्या-मामा,ताई-दादा,आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की मुला-मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही.आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते. आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक- तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या




कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात.म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक पितृदिन दीसुन येईल.माझ्यामते पितृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज का साजरा का करू नये ? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.पितृत्व दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृती जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी- आजोबा,काका-काकु,मामा-मामी, आत्या-मामा,ताई-दादा इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबर मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मान अवश्य होईल असे मला वाटते.आपण १५ जूनला पितृदिन (फादर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने निसर्ग दिवसेंदिवस कोपत आहे.याकरीता जागतिक पितृत्व दिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.कारण आज बदलत्या हवामानामुळे निसर्ग दिवसेंदिवस ढासळत आहे.त्यामुळे आई-वडीलांपेक्षा मोठी आणि महान म्हणजे धर्तीमाता (पृथ्वी) ज्यामुळे आज आपण या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने पृथ्वीमाता आज धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. त्यामुळे तीला वाचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आली आहे. करिता पृथ्वीला आई-वडीलांचा दर्जा देवून मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षलागवड व्हायला हवी.यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूच्या रक्षणासाठी मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने हा आगळावेगळा उपक्रम ऐतिहासिक ठरेल.

पान ४ वरून पुढे...

## आ.संदीप...

बाळासाहेब गोरे, बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम, हाजी नसीम इनामदार, सम्राट चौहान, मामु गुत्तेदार, शेख शाकेर, रामदास हांगे, माऊली सानप यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## चेअरमन केशव...

सुभाष शेलार यांच्यासह एका नातेवाईकांनी फरार केले असल्याचे ठेविदारांकडुन बोललं जात आहे. फरार होण्यास कोणाचा हात आहे, या प्रत्येकाला याबाबत शंका येत असताना अखेर ठेविदारांनी गेवराईतील वास्तविक असलेले प्रशांत शेलार व त्यांच्या कुटुंबाचा हात पळून लावण्यास असू शकतो. यात आरोपीला मदत करणारे, त्याला सुरक्षित ठिकाणी पोहोचवणारे किंवा पोलिसांच्या तपासात अडथळा आणणारे

पान ४ वरून पुढे...

लोकसामील असू शकतात. असा अंदाज ठेवीदारांकडून व्यक्त होत आहे.यात मदत करणाऱ्या व्यक्ती, ठिकाणे आणि घटनाक्रम महत्वाचे आहेत कुठल्या मार्गाने, कोणत्या ठिकाणी फरार झाला आहे याचा गेवराई येथील पोलीस प्रशासनाला तपास करणे आवश्यक असताना तात्काळ या आर्थिक तक्रारीच्या अनुषंगाने तपासाचे चक्र फिरवावे अन्यथा याबाबत ठेविदार जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करतील असा विश्वास काही ठेविदारांनी व्यक्त करत याप्रकरणी स्वतः हा एस. पी. साहेबांनी संबंधित पळून लावणाऱ्या लोकांच्या घराची तपासणी करावी अशी मागणी होत आहे

## बीड जिल्ह्यातील...

अनेक कामगारांना कसले ही वस्तू न भेटता त्यांचा नावे वस्तू संच उचल्याच सांगण्यात येत आहे सदरील प्रकरणात मे मफतलाल इंडस्ट्रीज

पान ४ वरून पुढे...

लिमिटेड.संस्था व कामगार विभाग संबंधित कर्मचाऱ्याची मिली भगत असून सर्व प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी नसता लोकशाही मार्गाने कामगारांच्या हिता साठी महाराष्ट्र बांधकाम संघटनेच्या वतीने लवकरच जिल्हा सरकारी कामगार कार्यालय समोर उपोषनांस बसवण्यात येईल असा इशारा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक यांनी दिला

## वादळी पावसाने...

शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीही करता आल्या नाहीत. काही शेतकऱ्यांचा पावसाने झोडपलेला कांदा कवडीमोल भावाने विकला गेला. तीन दिवसांपूर्वी वादळात विजेचे खांब व तारा तुटल्याने सर्वत्र विज पुरवठा खंडीत झालेला आहे. विज नसल्याने पिण्याच्या पाणी प्रश्न तसेच जनावरांचा पाणी प्रश्न गंभीर बनला आहे. या भागात दुध व्यवसाय मोठा आहे त्यामुळे अनेक शेतकऱ्यांकडे गाईचे गोठे असुन त्यामध्ये जास्त

पान ४ वरून पुढे...

संख्येने गाई आहेत त्यांना लागणारा चारा बारीक करण्यासाठी विजेची आवश्यकता आहे तसेच गाईसाठी पिण्याकरीता पाणी भरपूर लागते. तीन चार दिवसांपासून विज पुरवठा सुरळीत नसल्याने शेतकऱ्यांना तसेच व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागते आहे. विज पुरवठा बंद असल्याने स्वयंपाक घरातील पिठापासून अनेक समस्यांना निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे महावितरण कंपनीने विज पुरवठा दोन दिवसांत सुरळीत करावा. वादळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या घरांचे, कांदा चाळी, जनावरांचे गोठे यावरील पत्रे उडून गेले आहेत. तसेच फळबागां आणि कांदा व इतर पिकांचे झालेले नुकसान यांचे फक्त पंचनामे न करता शासनाने पंधरा दिवसांच्या आत पिडीत शेतकऱ्यांच्या खात्यात आर्थिक मदत जमा करावी नसता आष्टी मतदारसंघातील पिडीत शेतकऱ्यांना घेऊन आष्टी तहसीलवर प्रचंड प्रमाणात मोर्चा काढला जाईल असा इशारा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिला आहे.

पान १ वरून पुढे...

## अलोट गर्दीत...

झाले. या वेळी तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, नारायण महाराज भाऊ उत्तरेशोर प्रप्रिी, यांच्या सह महंतांची उपस्थिती होती.

अखंड हरिनाम सप्ताह काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. संदीपान महाराज हासेगावकर यांनी महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, संत ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम, मुक्ताई, जनाबाई, सावता माळी, गोरोबा कुंभार, अशी खूप मोठी संत परंपरा महाराष्ट्राला वैभव प्राप्त करून देते.तर माऊली दादा सारख्या संतांमुळे महाराष्ट्राचे वैभव उच्च शिखरावर पोहोचले आहे. कीर्तन, भजन, सप्ताह या माध्यमातून समाज प्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन, समाज परिवर्तनचे मोठा काम माऊली दादांनी केले आहे. माऊली दादा हे करुणेचा सागर होते, लेकरासारखी माया करत होते म्हणून सर्व लेकरं माऊली दादांच्या हाकेला धावूत येत होते. त्यांच्यामुळेच आज धर्म रक्षणाचे काम होत आहे.असे प्रतिपादन ह.

पान १ वरून पुढे...

भ. प. संदीपान महाराज हासेगावकर यांनी केले. या वेळी तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, नारायण महाराज भाऊ उत्तरेशोर पिंप्री, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे,ज्येष्ठनेते नंदकिशोर मुडदा, आदींसह राज्यभरातून आलेले भाविक उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी विवेक...

पेरणीच्या कामात व्यग्र झाला असून, याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी खंडाळा येथील शेतकरी बाबासाहेब चिंतामण जायभाये यांच्या शेतात जाऊन सोयाबीन बियाण्यांची मुठ स्वतः हातात घेतली आणि पेरणी केली.

या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि

पान १ वरून पुढे...

शासनाच्या योजनांची माहिती दिली. योग्य बियाणे, खतांचा पुरवठा वेळेत होण्यासाठी कृषी विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्या. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, जिल्हाधिकाऱ्यांची ही सक्रिय भूमिका संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. त्यानंतर त्यांनी गावातील महावितरणचे विद्युत पोल आणि तारा यांची पाहणी करून आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बिंदुसरा तलावाची पाहणी आणि सूचना- त्यानंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख स्रोत असलेल्या बिंदुसरा तलावाची पाहणी केली. तलाव परिसरातील स्वच्छता, सुरक्षा आणि जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने तेथील स्थितीचा आढावा घेतला.

या पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देत म्हटले की, तलाव परिसरात स्वच्छता राखावी, सुरक्षेची उपाययोजना मजबूत करावी, तसेच पाणी साठवण आणि पुरवठा व्यवस्थेवर लक्ष

पान १ वरून पुढे...

ठेवावे. यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या समस्या आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांची जाणीव ठेवत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी थेट कृतीद्वारे प्रशासन नागरिकांच्या पाठीशी असल्याचा विश्वास निर्माण केला आहे. त्यांच्या या सक्रियतेचे सर्वत्र कौतुक होत असून, प्रशासन-जनतेतला दुरावा कमी होण्यास मदत होत आहे.

## घरकुलाचे रजिस्ट्रेशन...

असल्याने हे ग्रामसेवक महोदय लाभार्थ्यांची दिशाभूल करून आर्थिक पिवळणूक करतात असेच दिसून येत आहे.त्यामुळे ग्रामसेवक गिरी यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी राहेरीचे माजी उपसरपंच अविनाश लाड आणि माजी सदस्य शिवकुमार लाड यांनी दिनांक १६ मे रोजी केली होती यावर गटविकास अधिकारी यांनी काय कार्यवाही केली हे पहावे लागेल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मा.बच्चु भाऊ कडु यांच्या अन्नत्याग आंदोलनाला लिंबागणेशकरांचा पाठिंबा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफीसह, शेतीमालाला हमीभाव, शेतमजूर, दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी, विविध प्रश्नासंदर्भात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चु भाऊ कडु यांचे राष्ट्रसंतांच्या महासमाधीपुढे गुरूकुंज मोझरी येथे गेल्या ७ दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू असुन बच्चु कडु यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे कटु सत्य असुन शेतमालाला भाव नाही, राज्यात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत.सत्ताधा-यांनी निवडणुकीत दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळले नाही.आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी हताश होऊन टोकाचे पाऊल उचलुन आपले जीवन संपवत आहे. अवकाळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळत नाही.जगाचा पोशिंदा बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे मा.बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ आज दि.१४ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेशकरांनी मुख्य प्रवेशद्वार याठिकाणी बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ व शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे शेतीमालाला हमीभाव मिळालाच पाहिजे, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण अशी



घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. शेतकरी कर्जमाफीसह प्रमुख मागणीसह ईतर मागण्या मान्य करून बच्चु भाऊ कडु यांच्या जिवीतास धोका असुन परिस्थिती चिघळण्या अगोदरच बेमुदत आमरण उपोषण सोडवण्याची मागणी करत बच्चु भाऊ कडु यांना ईमेल द्वारे आपला पाठिंबा दर्शविला आहे. निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवले आहे. यावेळी राजेभाऊ गिरे, भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष नितिन सोनावणे, विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, संतोष भोसले, सय्यद अख्तर, सुरेश निर्मळ, आरूण निर्मळ, राहुल जाधव, तुकाराम गायकवाड, रामदास मुळे, अर्जुन गोंडे, आश्रुबा गिरे, भगवान मोरे, राम किसन गिरे,लहु घोलप, दत्ता घरत, तुषार गायकवाड,शहाजी वाणी, भालचंद्र गिरे, लहु घोलप आदी सहभागी होते.

# राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांच्याकडून पत्रकार बांधव आणि पोलीस कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस बीड जिल्हा मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांच्याकडून आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस यांचा गौरव करत रेनकोट देवून अनोख्या पध्दतीने साजरा केला आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस राज्यभरात मनसैनिक वेगवेगळी शिबिरे राबवून साजरे करत असतात बीड जिल्हा मनसेने मात्र जनतेच्या सेवेसाठी आपत्कालीन सेवा देणारे पत्रकार आणि पोलीस सदैव तत्पर असतात त्यांचा गौरव होणे गरजेचे आहे असा मनोमन निर्णय एकमताने घेवून दि.१४ जून २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार बांधवांचा आणि बस स्टँण्ड येथील पोलीस चौकीमधील पोलीस कर्मचार्यांना रेनकोट देवून सन्मान केला आहे. यावेळी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम यांच्यासह सिद्धेश्वर धोंडगे, कृष्णा देवकुळ, केशव रत्नपारखे , गणेश भोसले, टिनू राजपूत आदी मनसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## संपादक शेख कामरान यांना 'निर्भीड पत्रकारिता पुरस्कार जाहीर : रविवारी होणार पुरस्काराचे वितरण



**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी आणि निर्भीड पत्रकारितेची दखल घेऊन व्यक्तिमत्वाला साजेल असा निर्भीड पत्रकारिता पुरस्कार घोषित करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण रविवारी (दि.१५) दुपारी ३ वाजता एका शानदार कार्यक्रमात सर सय्यद स्कूल जम जम कॉलनी येथे वितरण करण्यात येणार आहे. शहरातील सामाजिक उपक्रमात अग्रस्थानी असलेल्या अल-खैर मल्टीपर्पज फाऊंडेशन,बीड कडून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. यासाठी अनेक उल्लेखनीय काम करणाऱ्यांना विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये दैनिक किसानची मागील चार वर्षांची वाटचाल आणि जपलेला निर्भीडपणा, तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नावर लेखणी झिजवणारे संपादक शेख कामरान राजू यांना निर्भीड पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार त्यांना साजेल असा असून, चार वर्षात सामान्यांसाठी किसानने कधीच तडजोड केली नाही. या पुरस्काराचे वितरण रविवारी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आणि गौरव सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

# FUEL संस्थेच्या 'हूनर की खोज' उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती व विनामूल्य प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करण्याचे धनंजय मुंडे यांचे आवाहन

## परळी मतदारसंघातून प्रतिभावान व गरजू कुटुंबातील 10 विद्यार्थी ठरणार मानकरी

**परळी वै.। प्रतिनिधी**

पुण्यातील नामांकित FUEL एज्युकेशन संस्थेच्या 'हुनर की खोज' या उपक्रमांतर्गत परळी मतदारसंघातून १० निवडक विद्यार्थ्यांना विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी शिक्षण तसेच कौशल्य विकास व रोजगाराभिमुख प्रशिक्षण विनामूल्य दिले जाणार असून यासाठी गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी धनंजय मुंडे यांच्या जगमित्र संपर्क कार्यालयामध्ये नोंदणी करावी असे आवाहन माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या सहकार्यातून फ्युएल एज्युकेशन संस्थेने हा विशेष उपक्रम राबवला असून या अंतर्गत परळी मतदारसंघातून BB (C/IB), PGDM, MC, MB यांसारख्या अभ्यासक्रमांसाठी व्यवस्थापन शिक्षण, कौशल्य विकास तसेच रोजगाराभिमुख प्रशिक्षण विनामूल्य दिले जाणार असून विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती देखील देण्यात येणार आहे. विविध उच्च शिक्षण पदवी, प्रशिक्षण तसेच पदव्युत्तर पदवीसाठी सीईटी दिलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणांकनासह परळीतील जगमित्र कार्यालय येथे दि. २० जूनच्या आत जगमित्र कार्यालय येथे श्री. बी. एल. रूपनर (मो. ९४२२९३०५४२) यांच्याकडे नोंदणी करावी, पात्र विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न हे तीन लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे एवढी एकच अट यासाठी असणार आहे; असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

FUEL ही पुण्यातील एक नामांकित शिक्षण - प्रशिक्षण संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून शिष्यवृत्ती, इंटर्नशिप यासह विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.

# एस. के. एच. मेडिकल कॉलेजमध्ये दिव्यांगांसाठी होमिओपॅथिक शिबिर यशस्वीरित्या संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था संचलित सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, बीड आणि प्रिडीक्टिव्ह होमिओपॅथी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ०८ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेले दिव्यांग होमिओपॅथिक शिबिर अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले.

शिबिरादरम्यान डॉ. अनिकेत शितोळे, डॉ.योगेश खर्चे यांनी च्या सिद्धांतानुसार प्रत्येक रुग्णाची सखोल घेऊन, विश्लेषण करून एकूण ३४० रुग्णांची तपासणी केली व होमिओपॅथिक औषधोपचार दिले. यामध्ये मति



मंदता, गतिमंदता, मूकबधिरता, झटके आणि इतर असाध्य आजार असलेल्या बालकांचा समावेश होता.शिबिरात ३५ पेक्षा अधिक स्वयंसेवक, १९ डॉक्टर्स, तसेच ३६ आंतरवासियता प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांनी सहभागी होऊन शिबिराच्या यशस्वीतेसाठी मदत केली. या उपक्रमाचे नेतृत्व जगप्रसिद्ध Predictive Homoeopathy संकल्पनेचे प्रवर्तक कै. डॉ. प्रफुल्ल विजयकर यांच्या विचारधारेवर आधारित असून, हे शिबिर संस्थेचे सचिव श्री. जयदत्त अण्णा क्षीरसागर (माजी मंत्री, महाराष्ट्र सरकार ) यांच्या प्रेरणेतून गेली १५ वर्षे सातत्याने आयोजित केले जात आहे.सदर शिबिर महाविद्यालयाचे मार्गदर्शक डॉ. अरुण भस्मे, प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उप-प्राचार्य डॉ. गणेश पांगारकर, बाहयरूग्ण विभाग प्रमुख डॉ.अंजली पांगारकर, शिबिर समन्वयक डॉ. अमित भस्मे ,बालरोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. पूनम शिंदे, सामाजिक कार्यकर्ते श्री. मुळी (सोशल वर्कर) यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले होते.

# वामा चित्रपटाचे यशस्वीरित्या चौथ्या आठवड्यात पदार्पण, भोपाळ येथून 'गौरी शंभू' ची सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

सुपरस्टार डॉ.महेश कुमार च्या वामा लढाई सन्मानाची चित्रपटाचे यशस्वीरित्या चौथ्या आठवड्यात पदार्पण झाले असून दुसऱ्या चित्रपटाचे देखील मध्य प्रदेशचे आमदार गोपाल सिंग यांच्या हस्ते डॉ. महेश कुमार यांच्या नवीन चित्रपट गौरी शंभू ची भोपाळ इथून यशस्वी सुरुवात झाली. यावेळी आमदार गोपाल सिंग यांनी भोपाळ येथे दि. ११ जून रोजी डॉ.महेश कुमार यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

हिंदी चित्रपटांच्या तोडीस तोड मराठी चित्रपट वामा ला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले.



मागच्या एका महिन्यापासून बीडमध्ये सर्वत्र वामा चित्रपटाची चर्चा होताना दिसत आहे, बीडच्या मातीतून उगवलेला एक सितारा बॉलीवूड गाजवत आहे , ही बीडकरांसाठी देखील अभिमानास्पद गोष्ट आहे.

वामा चित्रपटाला बीड जिल्ह्यातील प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल पहिल्या येणाऱ्या १० महिलांसाठी वामा चित्रपट मोफत असणार आहे. तसेच महाराष्ट्रभर सुरू असलेले ३०० रुपये तिकीट बीडकरांसाठी सरसकट सर्वांसाठी फक्त ११० रुपये करण्यात आलेले आहेत.

शुक्रवार ते रविवार सकाळी ९ आणि सोमवार ते गुरुवार सायंकाळी ६:३० वाजता शो चा टाईम आहे. तनिष्का सिनेमा टॉकिज छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ बीड येथे सर्वांनी वामा चित्रपट पहावा आणि मनोरंजन सह एक नवीन दृष्टिकोन अनुभवावा असे आवाहन दिग्दर्शक अशोक आर कोंडके आणि निर्माता सुब्रमण्यम कडियाला यांच्याकडून करण्यात आले आहे.

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलगी ज्योती अंकुश नहीराळे वय १७ वर्षे १० महिने पत्ता पिठ्ठी ता. पाटोदा जि. बीड ही मुलगी श्रीअभ्यासिका, माने कॉम्लेक्स रोड बीड येथून दि. १५/०५/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वा चे दरम्यान रिडींग मधून कोणाला काहीही न सांगता निघून गेली. सदर मलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. नाव ज्योती अंकुश नहीराळे, वय १७ वर्षे १० महिने, पत्ता रा. पिठ्ठी,ता.पाटोदा जि. बीड, रंग गोरा,उंची ०५ फुट, अंगात राखडी रंगाचा शर्ट, जिन्स पॅट, पायात सॅन्डल, भाषा मराठी, चेहरा गोल, अंगाने सडपातळ वर्णनाची आहे. मुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास शिवाजी नगर पोलीस ठाणे बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे मपोउपनी, एन.जी दामधर यांनी कळविले आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून दि.६ जून रोजी सकाळी १०.०० वाजता शिवराज्याभिषेक दिन या कार्यक्रमाचे व्हिडोओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपूर्ण महाराष्ट्रातील ४१९ शासकीय आय.टी.आय. मध्ये करण्यात आले. तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माजलगाव या संस्थेत देखील यावेळी शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी



म्हणून आ.प्रकाश सोळंके हे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते छ.शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सोळंके यांनी ३५० वर्षापूर्वी शिवराज्याभिषेक दिन साजरा झाला होता, त्यावेळची परिस्थिती आणि आजची सद्यस्थिती यावर उजाळा देत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आयएमसी सोसायटी औ.प्र.सं.माजलगाव चे पदसिध्द सदस्य प्रविण येताळ हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून कमलाकर जोशी, तुकाराम येवले, संभाजी शेजूळ हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी ज्ञानवर्धिनी कोचिंग क्लासेसचे संचालक अशोक काळे हे प्रमुख वक्ते म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अशोक काळे यांनी नागरी कर्तव्य व शिष्टाचार या विषयावर उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाबासाहेब घाटूळ यांनी केले तर प्रास्ताविक एन.पी.पटवी यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ए.ए.पठाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य एस.ओ.बनगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी संस्थेतील सर्व कर्मचारी आणि सर्व ट्रेडचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३६/२०२५**

**नारायण बन्सी घोडके विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय शिवळी**

पहा

१ - **नारायण बन्सी घोडके , रा.शिवळी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **नारायण बन्सी घोडके** यांचा दिनांक ०७/०६/१९९१ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहून अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **शिवळी** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालय **शिवळी** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३/०६/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०६/२०२५ ही आहे.

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार**
**बीड**

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

रविवार, दि.१५ जून २०२५



## रोडवरील अपघातग्रस्तांनाही एक कोटीची मदत द्या: गायकवाड



परळी वै.। प्रतिनिधी

एसटी महामंडळ मध्ये मोडक्या गाड्या व गळक्या भंगार गाड्यातून प्रवाशांची सरस वाहतूक सुरू. वासून शासनाने वेळीच या गोष्टीची दखल घेऊन प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी घेऊन अपघातग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबालाही एक कोटी रुपयाची आर्थिक मदत करण्याची मागणी भारतीय दलित पँथर चे बीड जिल्हाध्यक्ष वैजनाथ गायकवाड व तालुका अध्यक्ष माणिकराव बनसोडे यांनी केले आहे. एसटी महामंडळाला विमान दुर्घटना नंतर तरी जाग येईल का ? असा सवाल भारतीय दलित पँथर चे जिल्हाध्यक्ष : मा. वैजनाथरावजी गायकवाड यांनी केला आहे. एस टी महामंडळाच्या वतीने प्रवाशांची वाहतूक करण्यात येते. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. मोडक्या गाड्यामुळे, गळक्या गाड्या मधून प्रवाशांना प्रवास ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'मुंडे साहेबांमुळेच प्रगती झाली'...समृद्धी महामार्गावर हळवा क्षण; ना. पंकजाताई मुंडेंना आला भावनिक अनुभव



परळी वै.। प्रतिनिधी

वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी आयुष्यभर झगडणारे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती आजही जनमानसात किती खोलवर रुजलेल्या आहेत, याचा छोटासा पण अतिशय भावनिक करणारा अनुभव नुकताच पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला. समृद्धी महामार्गावर प्रवास करत असताना, बाजुच्या लेनमधून धावणाऱ्या दुसर्या एका गाडीतून अचानक एका महिलेनं हातात कागद घेत तो पंकजाताईंना दाखवण्याचा प्रयत्न केला. त्या कागदावर लिहिलं होतं – आम्ही मुंडे साहेबांमुळेच इंजिनिअर झालो... प्रगती झाली. Thank you!

हा प्रसंग पाहून क्षणभर पंकजाताईंनाही भावनिक आठवणींनी ओथंबून टाकलं. मेसेज मुंडे साहेबांसाठी होता. समृद्धी मार्गाच्या वेगासही तो क्षणभर थांबवून गेला, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

पंकजाताईंनी या हृदयस्पर्शी प्रसंगाचा व्हिडीओ आपल्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावर पोस्ट करत तो अनुभव शेअर केला आहे. या व्हिडीओमुळे अनेकांना गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याची आठवण झाली आणि अनेकांनी कमेंट्समधून आपल्या भावना व्यक्त केल्या.

गोपीनाथराव मुंडे यांनी आयुष्यभर ग्रामीण, मागास, वंचित आणि शोषित घटकांच्या न्यायासाठी कार्य केलं. त्यांच्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची, तरुणांना रोजगाराची आणि गरजूंना मदतीची संधी मिळाली. त्यामुळेच आजही अनेक कुटुंबं त्यांना देव मानतात.

हा अनुभव केवळ भावनिक नसून, गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्याचा जनमानसात किती दीर्घकालीन आणि खोलवर प्रभाव आहे, याचं जिवंत उदाहरण ठरला आहे.नेते आपल्यातून जातात, पण त्यांचं काम आणि त्यांची लोकांच्या हृदयामधील जागा कायम राहते. मुंडे साहेबांनी ही जागा आपल्या कार्यातून निर्माण केलेली आहे, हेच या प्रसंगातून पुन्हा एकदा सिद्ध झालं.



*संत वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्री. प्रदीप मिश्रा यांच्या वाणीतून सुरू असलेल्या शिव महापुराण कथेचा आज समारोप होत असून, याप्रसंगी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे चाकर वाडी येथे उपस्थित राहिले. यावेळी त्यांनी श्री प्रदीप मिश्रा तसेच महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. या सोहळ्याच्या अंतिम दिवशी आज महापंगतीला महाप्रसाद देण्याचा मान परळी करांना आयोजकांच्या वतीने देण्यात आलेला असून, याबद्दल धनंजय मुंडे यांनी आयोजकांचे आभार मानले.*

# आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली शेषेराव तांबे, अक्षय मानेंचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

बीड । प्रतिनिधी

पुर्वाश्रमीचे शिवसंग्राम पक्षाचे पदाधिकारी असलेले शेषेराव तांबे आणि अक्षय माने यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला.

शनिवारी (दि.१४) रोजी बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे शेषेराव तांबे, अक्षय माने यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी सामाजिक क्षेत्रात लक्षणीय काम करणारे स्व.विनायक मेटेंच्या शिवसंग्राम पक्षामध्ये पुर्वाश्रमीचे असलेले पदाधिकारी शेषेराव तांबे आणि अक्षय माने यांनी आ.संदीप क्षीरसागर व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यास माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.उषाताई दराडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष संजीवनी देशमुख, बीड तालुकाध्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर



### ●मेटे साहेबांचे अधूरे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार– आ.संदीप क्षीरसागर

**स्व.विनायक मेटे साहेब हे शून्यातून तयार झालेले आणि मातीशी नाळ असलेले नेतृत्व होते. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात स्व.मेटे साहेबांचे योगदान अविस्मरणीय आहे. मेटे साहेबांनी पाहीलेली स्वप्ने पूर्ण करण्याचा मी कायम प्रयत्न करत आहे. स्व.साहेबांनी पाहिलेले बंधारा कम पुलाचे स्वप्न आता पूर्णत्वाकडे जात आहे. मेटे साहेबांनी आपल्या उभ्या कारकीर्दीत मराठा आरक्षणाचा प्रश्न कायम लावून धरला. त्याच भूमिकेला धरून मीही मराठा आरक्षणाच्या मागणीवर पाठपुरावा केला. यासोबतच बीड पंचायत समितीच्या आवारात स्व.मेटे साहेबांचा पुतळा बसविण्यासाठी माझा पाठपुरावा सुरू असून लवकरच पुतळा उभा राहिलेला असेल. स्व.मेटे साहेबांचे अधूरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी कायम प्रयत्नशील असल्याची भावना आ.संदीप क्षीरसागरांनी यावेळी व्यक्त केली.**

# चेअरमन केशव पंडित फरार, पळवून लावण्यात मेव्हण्याचा हात; ठेविदारांचा आरोप

### ▸एस. पी. नवनीत कॉवत साहेब यांनी लक्ष्य घालावे

गेवराई । प्रतिनिधी

श्री . मंगलनाथ मल्टिपल निधीचे चेअरमन केशव शेषनारायण पंडित हे वेड्यांचे सोंग घेऊन कुटुंबासोबत २३ मार्चपासून फरार झाले आहेत या प्रकरणी तीन महिने काही दिवस उलटले असतानाही पोलीस स्टेशन गेवराई येथे तक्रार दाखल करण्यात आलीय मात्र आरोपी फरार आहे. यावरून ठेविदार बांधवांनी संताप व्यक्त केला. त्या आरोपींना त्यांचे मेहुणे प्रशांत सुभाष शेलार व बहिण सुनीता प्रशांत शेलार , भागवत दीक्षित, प्रवीण सुभाष शेलार यांचे संरक्षण मिळत असल्याचा आरोप केला आहे आणि या प्रकरणात त्वरित कारवाईची मागणी केली आहे.गेवराई मधील बँकेच्या घोटाळ्याचा मास्टरमाइंड म्हणून ओळखला जाणारा केशव शेषनारायण पंडित तीन महिने काही दिवस उलटले आहेत. मात्र अद्याप या आर्थिक गुन्ह्यांच्या संदर्भात गेवराई पोलीस स्टेशनला तक्रार दाखल असताना अद्याप चेअरमन फरार आहे. दुसरीकडे छत्रपती संभाजी नगर येथील कादरी मनोरुग्ण हॉस्पिटलला केशव पंडित यांना मेंटल असल्याचा गवगवा करून काही दिवस त्या ठिकाणी उपचार सुरू करत त्यांचा मेव्हणा प्रशांत ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यातील कामगारांना गृहउपयोगी साहित्य न देता शासना कडून बोगस बिले घेणाऱ्या मे. मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड संस्थेवर कारवाई करा- नगरसेवक अमर शेख


बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नोंदीत कामगारांना साहित्य न देता साहित्याची रक्कम मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड संस्थेची व संबधित अधिकारी यांची चौकशी करून कारवाई करणे बाबत महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांनी जिल्हाधिकारी बीड. मा मंत्री आ.धनंजय मुंडे यांना निवेदना द्वारे केले

निवेदनात अमर शेख यांनी म्हटले.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ अंतर्गत राज्यातील नोंदीत कामगाराकरिता गृह उपयोगी साहित्य वितरण करण्या साठी. मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी संस्थेची निवड करण्यात अली राज्य संह बीड जिल्ह्यात मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड कामगारांचे ऑनलाइन अर्ज प्रोसेस करून घेतले पण बीड जिल्ह्यातील ४० टक्के लोकांना साहित्य मिळालेले नसून बीड जिल्ह्यातील अनेक कामगार मे मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड संस्था कार्यालय नामलगाव तालुका बीड येथे हेलपाटा मारतात संस्थेतील कर्मचारी काहीच उत्तर देत नसून उलट तुमचे वस्तू तुम्हाला देण्यात आल्याचे सांगतात ▶▶ उर्वरित पान २ वर



## जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत उर्जित गिरवलकरचे यश



परळी वै.। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशन अंतर्गत बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन व चंपावती क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच बीड जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा बीड येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत परळी येथील उर्जित मधुकरअप्पा गिरवलकर याने ११ वर्षाखालील वयोगटात एकेरी स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत घवघवीत संपादन केले आहे. उर्जित हा परळी येथील श्री वीरभद्रेश्वर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापकश्री.मधुकरअप्पा गिरवलकर यांचा मुलगा आहे लहानपणापासूनच एक वेगळे क्षेत्र निवडत तो प्रशिक्षक चेतन पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बॅडमिंटनचे धडे गिरवत आहे.त्याच्या या यशाबद्दल बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, आमदार विजयराजे पंडित, बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव डॉ.बळीराम गवते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# चोभानिमगाव येथे वादळी वाऱ्यासह पावसाने डाळिंब बागेचे मोठं नुकसान

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील चोभा निमगाव येथे वादळी वाऱ्या सह जोरदार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे डाळिंब बागेचे नुकसान झाले. चोभा निमगाव येथील शेतकरी रामलाल किसन थेटे या शेतकऱ्याने कर्ज उसनवारी करून चार वर्षांपूर्वी सहाशे डाळिंबाची झाडांची बाग फुलवली होती. परंतु या वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने सहाशे झाडा पैकी किमान दोनशे झाड पडले आहेत,या वर्षी त्यांनी अडीच तीन लाख रुपये खर्च करून झाड संगोपन केली होती ,चार वर्षापासून ते या झाडांना खर्च संगोपन करत आहेत. काल परवा झालेल्या पाऊसाने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. लवकरात लवकर शेतकऱ्यांची या नुकसानीचे पंचनामे करून दखल घेऊन शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा. फळ बागेचे जितक्या प्रमाणात नुकसान झाले तितक्याच प्रमाणात मदत मिळावी. नुकसान लाखात मदत हजारात असे करू नका अशी मागणी येथील शेतकरी करत आहेत.






*बीड : राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध क्रीडा प्रकारासाठी जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देणारे तसेच सदैव उत्कृष्ट कामगिरी बजावणारे कर्तव्यदक्ष जिल्हा क्रीडा अधिकारी यांना मातृभूमी प्रतिष्ठान च्या वतीने उन्हाळी विविध क्रीडा प्रशिक्षण शिबीर समारोप प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचा सन्मानपत्र, शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे ,मातोश्री विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे उपस्थित होते.*

# वादळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी, महावितरणने विज पुरवठा सुरळीत करावा : माजी आ. भीमराव धोंडे

पाटोदा । प्रतिनिधी

तीन दिवसांपूर्वी झालेल्या वादळी पावसाने आष्टी मतदार संघातील अनेक गावातील शेतकऱ्यांचे फळबागा तसेच कांदा पिकाचे आणि घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनाम्याबाबत कसलेही निकष न लावता तात्काळ आर्थिक मदत द्यावी, त्याचप्रमाणे वादळाने अनेक भागात विजेचे खांब पडले आहेत, तारा तुटल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना आणि व्यावसायिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वादळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना येत्या पंधरा दिवसाच्या आत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात आर्थिक मदत जमा करावी अन्यथा अशा पिडीत शेतकऱ्यांना घेऊन आष्टी तहसीलवर प्रचंड मोर्चा काढण्यात येणार असल्याचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले.



याबाबत अधिक माहिती देताना आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, प्रत्येक वर्षी मे महिन्यात थोड्याफार प्रमाणात अवकाळी व वादळी पाऊस पडतो त्या पावसाने शेतकऱ्यांचे थोडेफार नुकसान होते. यंदा मात्र प्रचंड प्रमाणात वादळी पाऊस झाला. आष्टी मतदारसंघात वेगवेगळ्या फळबागाचे क्षेत्र मोठे आहे. कांदा पिक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. शेतकरी वर्ग उन्हाळी कांदा काढून तो वाळवून भुसारा भरुन ठेवतात. परंतु मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आणि या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या कांद्याचे प्रचंड नुकसान झाले. अक्षरशः कांदा शेतात साचलेल्या पाण्यात भिजून त्याचा चिखल झाला. निसर्गाने हातातोंडाशी आलेला घास हीराऊन घेतला. त्याच कांदा विक्रीतून शेतकरी पुढील हंगामातील बी, बियाणे, खते तसेच पाळी – पेरणी यांचे नियोजन करतो, तसेच लेकरांच्या शिक्षणासाठी लागणारा खर्चही त्यावर अवलंबून होता. पावसाने कांद्या बरोबर फळबागांचे प्रचंड नुकसान झाले . येत्या महिन्याभरात तोडणीसाठी आलेल्या डाळिंब बागा उन्मळून पडल्या आहेत तसेच आंबा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. मे महिन्यातील अवकाळी पावसाने ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK